# दहावीनंतर 'डिप्लोमा' की बारावीनंतर 'डिग्री'

**दहावीनंतर डिप्लोमा करून थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेशाची अपेक्षा करणाऱ्यांची संख्या वाढू लागलेली, सीईटीमधील स्पर्धा, शिक्षणानंतर रोजगाराच्या संधी तातडीने मिळविण्याची ओढ यासह इतर कारणांनी विद्यार्थी या मार्गाचा अवलंब करताना दिसतात. या व्यवस्थेचे फायदे -तोटे सांगणारे काही मुद्दे...**

**महेश नरके**

बारावीनंतर अभियांत्रिकी प्रवेशासाठी सीईटी सुरू झाल्यापासून दहावीनंतर डिप्लोमा करून थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेशाची अपेक्षा करणाऱ्यांची संख्या वाढू लागलेली दिसते. डिप्लोमाकडून डिग्रीकडे जाण्यासाठी सध्या तरी प्रवेश परीक्षा नाही.

वास्तविक पाहता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने पदविकेची रचना ही महाराष्ट्र राज्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांकडून असणारी तंत्रज्ञांची गरज भागविण्यासाठी केली. डिप्लोमा पदविका करणाऱ्या प्रत्येकानेच डिग्री (पदवी) आग्रह धरणे अव्यवहार्य आहे. म्हणूनच डिग्री प्रवेशासाठीच्या संस्थेवर मर्यादा घालण्यात आली (एक षष्ठमांश); परंतु बदललेल्या अर्थव्यवस्थेनुसार आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विस्तारानुसार पदविका अभियंत्यांना आपली शैक्षणिक अर्हता ही प्रगतीतील अडथळा वाटू लागली. कामाचे स्वरूप ही तांत्रिक सुपरव्हायजरी स्वरूपाचे राहून बढतींचा वेग मंद असल्यामुळे या अभियंत्यांना पदवीची अपरिहार्यता जाणवू लागली. पदवीनंतर खासकरून एमबीए करून व्यवस्थापन क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या संधी त्यांना खुणावू लागल्या. दहावीनंतर डिप्लोमा हा तीन वर्षांचा अभ्यासक्रम आहे.




व थेट द्वितीय वर्ष प्रवेशामुळे त्यांच्या हातात सहा वर्षांनी पदवी असते तर दहावीनंतर बारावी करून चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम करणाऱ्यांसाठीही तेवढाच कालावधी लागतो.

डिप्लोमा डिग्रीकडे जाणाऱ्यांसाठी ६०% (शेवटच्या वर्षाचे गुण) गुणाची अट असते; परंतु मागणी पुरवठ्याच्या व्यस्त प्रमाणामुळे नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी बहुतेक वेळा ८०% ही अपुरे ठरतात.

**डिप्लोमाकडून डिग्रीकडे जाण्याचे फायदे कोणते व कोणासाठी?**

१) डिप्लोमानंतर डिग्री प्रवेशासाठी आरक्षणाचे कोणतेही नियम लागू होत नाहीत. तसेच विद्यापीठस्तरीय कोटाही नसतो. त्यामुळे फक्त मेरीटनुसार चालणारी एकमेव अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया बारावीनंतर सीईटीद्वारे अभियांत्रिकी प्रवेश घेताना खुल्या गटाच्या मुला-मुलींसाठी मर्यादित जागा उपलब्ध असतात. तर आरक्षणाचा फायदा घेणाऱ्यांसाठी डिप्लोमानंतर डिग्रीसाठी आरक्षणाची सोय नसते.

२) जरी खासगी विनाअनुदानित तंत्रनिकेतनामधून पदविका (उत्तम गुणांनी) पूर्ण केली असेल तरीही हे विद्यार्थी सरकारी, सरकारी-अनुदानित पदवी महाविद्यालयांसाठी पात्र असतात. मात्र त्यासाठी मेरिट हे ८५-९०% एवढे असते.

३) डिप्लोमाच्या शेवटच्या वर्षाचे एकूण गुण (थिअरी, प्रॅक्टिकल्स, प्रोजेक्ट इ.) प्रवेशप्रक्रियेसाठी विचारात घेतले जातात, तर बारावीनंतर फक्त सीईटीच्या गुणांच्या आधारे प्रवेश प्रक्रिया राबविली जाते.

**बारावीनंतर 'डिग्री' करण्याचे फायदे कोणते व कोणासाठी?**

१) बारावीनंतर पदवी प्रवेशासाठी सुमारे ३०० महाविद्यालयांतील एक लाख जागा उपलब्ध असतात. मात्र 'डिप्लोमा'नंतर डिग्री प्रवेशासाठी साधारणतः १६-१७००० अधिक संस्थानिहाय रिक्त जागा (प्रथम वर्ष गळपासांमुळे इ.) उपलब्ध असतात.

२) डिप्लोमाच्या अंतिम वर्षी ६०% पेक्षा कमी गुण असतील तर पदवी प्रवेशासाठी असे विद्यार्थी पात्र ठरत नाहीत. मात्र बारावीनंतरच्या अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेसाठी सीईटीचा स्कोअर कमीत कमी १ (नॉन झिरो) आणि बोर्डाच्या परीक्षेमध्ये PCM साठी (खुला गट-१५०/राखीव जागा-१३५) गुणांची पात्रता पूर्ण करावी लागते.

३) बारावीनंतरच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यापीठस्तरीय (४५.५०%) कोटा, AIEEE कोटा (१५%), मॅनेजमेंट कोटा (२०%) आरक्षणाचे सर्व नियम लागू होतात. डिप्लोमानंतरच्या पदवी प्रवेशासाठी सर्व विद्यार्थी खुल्या गटातील समजूनच प्रवेशप्रक्रिया राबविली जाते.

४) बारावीनंतर पदवी अभियांत्रिकीसाठी सर्व शाखा उपलब्ध असतात. मात्र, पदविकेनंतर पदवीसाठी मर्यादित शाखा उपलब्ध होतात. विद्यार्थ्याने पदविका ज्या शाखेमधून उत्तीर्ण केली आहे त्या शाखेमधूनच (किंवा सब-ग्रुप/ग्रुपमधील दुसरी शाखा नियमानुसार) त्याला पदवी प्रवेश प्रक्रियेत भाग घेता येतो. उदा. मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदविकाधारक विद्यार्थ्यास कॉम्प्युटर इंजि. अगर इलेक्ट्रॉनिक्स इंजि.ला जाता येत नाही.

दहावीच्या टप्प्यावर पुढचे मार्गक्रमण ठरविताना विद्यार्थी आणि पालकांना वरील मुद्द्यांचा निर्णयप्रक्रियेत निश्चितच उपयोग होईल अशी आशा आहे.